# महाराष्ट्र वार्ता पत्र

## फेब्रुवारी २०१८

(खाजगी वितरणासाठी ई वार्तापत्र)

फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया (पश्चिम विभाग)

वर्ष तीन अंक १२



न्यु नायगांव मुनिसिपल स्कूल, रु. नं.२, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई - ४०० ०१४ ● दूरध्वनी ०२२-२४१३३१९१ ● Email : ffsiwr@gmail.com

संस्थापक अध्यक्ष : सत्यजित राय ● अध्यक्ष : किरण शांताराम ● उपाध्यक्ष : सुधीर नांदगांवकर - संपादक


### पुणे आशियायी महोत्सवात

# गिरीश कासारवल्ली यांना झेनिथ पुरस्कार



गिरीश कासारवल्ली यांना पुरस्कार प्रदान करतांना आर्काइव्हचे प्रकाश मगदूम शेजारी आशयचे सतीश जकातदार

**केवळ** मनोरंजन करणे हे चित्रपट माध्यमाचे काम नसून समाजभान निर्माण करणे हे कर्तव्य आहे. प्रश्नावर उत्तरे शोधण्यासाठी चित्रपट बनवू नयेत, तर चित्रपटांच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करणे महत्त्वाचे असल्याचे मत ज्येष्ठ कन्नड दिग्दर्शक गिरीश कासारवल्ली यांनी व्यक्त केले.

सहा वर्षाच्या मध्यंतरानंतर पुणे येथे पुन्हा सुरु झालेल्या ८व्या आशियाई चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ दिग्दर्शिका सुमित्रा भावे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात कासारवल्ली बोलत होते. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात झालेल्या या सोहळ्यात कासारवल्ली यांना कन्नड चित्रपट सृष्टीतील योगदानाबद्दल "झेनिथ एशिया" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक प्रकाश मगदूम, फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संचालक भूपेंद्र कंथोला, महोत्सवाचे सांयोजक सतिश जकातदार आणि विरेंद्र चित्राव उपस्थित होते.कासारवल्ली म्हणाले, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय आणि फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट या संस्थांनी माझ्या विद्यार्थिदशेत चित्रपट माध्यम आणि त्यातील संवेदनशीलतेचे संस्कार केले. त्या संस्थेच्या आवारात परत येणे आणि माजिद माजिदी यांना मिळालेला पुरस्कार मिळणे ही सन्मानाची गोष्ट आहे. आजचा भारतीय चित्रपट हा मातीतील माणसांची भाषा बोलणारे आणि त्यांच्या भावना मांडणारे समृद्ध माध्यम आहे.

सुमित्रा भावे म्हणाल्या, सत्यजित राय यांचा "पथेर पांचाली"पाहिल्यानंतर मातीतले चित्रपट बनविणाऱ्या दिग्दर्शकांचा शोध घेत होते. माझा शोध गिराश कासारवल्ली या नावापाशी संपला. वयाने माझ्यापेक्षा लहान असल्याने लहान भाऊ तर कर्तृत्वाने माझ्यापेक्षा मोठे असल्याने मोठे भाऊ असे दुहेरी नाते आम्हा दोघांमधे आहे. चित्रपटाने केवळ समाज प्रगल्भ होत नाही तर त्याचे परिवर्तन समाजामध्ये दिसते. म्हणून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा शोध सर्वांनी मिळून घ्यावा.

एक चित्रपट तयार होताना त्यामागे शेकडो लोकांची मेहनत असते. मात्र चित्रपटगृहात "पॉपकॉर्न"खाताना त्या मेहनतीला आपण न्याय देतो का, हा विचार प्रेक्षकांनी करावा.

सुमित्रा भावे यांचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट "कासव" काश्मीर येथे झालेल्या चित्रपट रसग्रहण अभ्यासक्रमात दाखविला असता तेथिल विद्यार्थिनीनी त्याला उत्तम प्रतिसाद दिला. असे सांगून भूपेंद्र कैंथोला यांनी मानवी भावनांचे प्रतिबिंब दाखवणाऱ्या अस्सल कलाकृती घडवणारे कासारवल्ली आणि सुमित्रा भावे एका व्यासपीठावर एकत्र आसल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

**(लोकसत्ता पुणे वरून साभार)**

---

### सौमित्र चटर्जीचा फ्रान्सकडून सन्मान

सत्यजित राय यांच्या अनेक चित्रपटात नायकाची भूमिका करणारा सौमित्र चटर्जी याचा फ्रान्स सरकारने सर्वोच्य नागरी पुरस्कार "लिजन ऑफ हॉनर" देऊन सन्मान केला. फ्रेंच वकीलांनी कलकत्ता येथे जाऊन ३० जानेवारीला सन्मान पदक सौमित्रला अर्पण केले. पुरस्काराला उत्तर देतानाच्या भाषणात सौमित्र म्हणाला, "या सन्मानाला मी योग्य व्यक्ती आहे की नाही हे मला ठाउक नाही. पण या पुरस्काची मी जन्मभर कृतज्ञेने आठवण ठेवीन." सत्यजित रायना हा सन्मान पुरस्कार १९८७ साली देण्यात आला होता. सौमित्र चटर्जीनी राय यांच्या "अपूर संसार"मधे पहिली भूमिका केली होती.

---

### प्रतिबिंब : लघु आणि माहितीपटमहोत्सव

अहमदनगर येथील न्यू आर्टस कॉमर्स कॉलेज तर्फे ११वा लघु व माहितीपट महोत्सव प्रतिबिंब या नावाने १५,१६, १७,१८ फेब्रु. २०१८ असे चार दिवस भरवला जाणार आहे. असे महोत्सव संचालक राहुल चौधरी यांनी कळविले आहे.महोत्सवात प्रवेशिका पाठविण्यासाठी http://pratibibmfilmfestival.blogspot.in पहावा.

# द.भा. सामंताचे "चंदेरी स्मृतिचित्रे"

**१६व्या आशियायी** चित्रपट महोत्सवाच्या सांगता समारंभात कै. द.भा. सामंत लिखित "चंदेरी स्मृतिचित्रे" या ३०० पानी पुस्तकाचे प्रकाशन झाले.पुस्तक छापायला जाण्यापूर्वीच लेखक द.भा. सामंत यांचे निधन झाल्याने प्रकाशन समारंभात त्याचा पुतण्या उपस्थित होता.

कै. सामंतांनी त्या १०/१२ वर्षात विविध वृत्तपत्रातू जे लेखन केले ते सर्व या पुस्तकात एकत्र करण्यात आले आहे. आणि त्यातून भारतीय सिनेमाच्या इतिहासाचा मोठा खजिना वाचकांसाठी खुला झाला आहे. भारतीय सिनेमाच्या अभ्यासकांसाठी हा ग्रंथ म्हणजे अनमोल ठेवाच आहे.

कै. सामंतांची पूर्व पीठीका सांगायलाच हवी. सामंताचा जन्म ६ सप्टेंबर १९३३ चा. निवास मुंबईत माहीमला. त्याकाळात शिवाजी पार्कलाच मराठी हिंदीतले कलावंत-दिग्दर्शक रहात असत. वयाच्या १०व्या वर्षापासूनच सामंत सिनेमा पहायला लागले. सिनेमा संबंधी सामंतांना विलक्षण कुतुहल होते. चित्रपट बोलू आणि गाऊ लागल्यावर सिनेमाचे अनेक भक्त तयार झाले. सामंत त्यापैकीच एक. पण सामंत सिनेमाचे केवळ षौकीन नव्हते रसिक होते. त्यामुळे कोणत्याही सिनेमाचा पहिला खेळ पहाणे, नट्यांना पहायला ताटकळत उभे रहाणे हे सामंतांनी कधीच केले नाही. तरीही त्यांचेसिनेमा-प्रेम उत्कट होते. त्याच बरोबर त्यांचे सिनेमा संबंधीचे वाचनही चांगले होते.




सामंत यथावकाश अकाऊंटंट जनरलच्या कार्यालयात नोकरीला लागले पण त्यांचा सिनेमाचा छंद त्या रुक्ष नोकरीतही सुटला नाही. सिनेमा पहाणे आणि त्या संबंधी वाचन करणे हा त्यांचा जणू एक ध्यास बनला.

सामंत ६०व्या वर्षी नोकरीतून निवृत्त झाले. प्रकृती चांगली आणि सिनेमा संबंधीचा उत्साह जराही मावळलेला नव्हता. व्ही. शांताराम फौंडेशनच्या ग्रंथालयात सामंत संशोधक सहाय्यक म्हणून रुजू झाले. ग्रंथालयात त्यांना सिनेमाच्या पुस्तकांचा खजिनाच मिळाला. त्यांच्या वाचनाला अभ्यासाची जोड मिळाली. मग सामंत लेखन करायला लागले, "चंदेरी स्मृतिचित्रे"मधे वाचकांना चकीत करणारी माहिती वाचायला मिळेल. मामा वरेरकर नाटककार म्हणून मराठी माणसाला ठाऊक आहेत. मामांनी "पुण्यावर स्वारी"हा मूकपट लिहला आणि दिग्दर्शित केला होता. असा माहितीचा आणि तीही अचूक प्रचंड खजिना या पुस्तकात आहे.

फोटो फाइल मधे बंडखोर शांता आपटे, न्यूहंसची द्रौपदी, शरदबाबूंची पारो जमुना, दादा कोंडकेची आये रत्नमाला अशा अनेक नायिकांची उत्कृष्ट शब्दचित्रे अचूक माहितीसह सामंतांनी रेखाटली आहेत. यातली किस्मतवाली मुमताज शांतीची कहाणी चटका लावणारी आहे. गुजरातच्या डिंगा गावात तिचा १९२२ साली जन्म झाला. पण लौकरच ती पोरकी झाली. तिचा मामा तिला संभाळू लागला. त्याची बदली लाहोरला झाली. तेथे मामाने तिला एका नृत्यशिक्षकाकडे नृत्याचे धडे दिले. सौंदर्य आणि नृत्य यामुळे सिनेमात तिला शिरकाव मिळेल हा मामाचा होरा होता. पण लाहोरच्या स्टुडिओत मुमताजला काम मिळाले नाही. पण गीतकार व दिग्दर्शक वली यांच्या नजरेत मुमताजचे रुप भरले आणि वलीसाहेबांमुळे तिला कलकत्याचा सोनीमहिवाल चित्रपट मिळाला. अशी कितीतरी खुमासदार व्यक्तीचित्रे या पुस्तकात आहेत.सोनी महिवाल खूप गाजला त्या सिनेमासाठी तिने मुमताज शांती हे नाव घेतले. पुढे बॉम्बे टॉकिज मधे "बसंत", "किस्मत" हे तिचे चित्रपट गाजले. वली साहेबांशी लग्न करून ती पाकीस्तानात गेली. मूकपटापासून ते १९५० पर्यंत काळ सामंतानी या स्मृतिचित्रात रेखाटला आहे.

**चंदेरी स्मृतिचित्रे**
पृष्ठे ३००, मूल्य ४५०रु.
प्रकाशक - व्ही. शातारामं फौंडेशन, मुंबई
प्रस्तावना - सुधीर नांदगांवकर
मुखपृष्ठ व रचना - रघुवीर कुल

---

<u>१५व्या मुंबई महोत्सवाची सांगता</u>

# श्याम बेनेगल यांना व्ही. शांताराम पुरस्कार प्रदान

**१५व्या** मुंबई आंतरराष्ट्रीय माहितीपट महोत्सवाचा सांगता सोहळा मुंबईत दिमाखात पार पडला. प्रमुख पाहुणे होते महाराष्ट्राचे राज्यपाल विद्यासागर राव आणि विशेष अतिथी होते. महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे मंचावर किरण शांतारामही उपस्थित होते.

कार्यक्रमाचा प्रारंभ नालंदा नृत्यालयाच्या विद्यार्थिनीच्या नृत्याने झाला.



किरण शांताराम, राज्यपालराव, श्यामबेनेगल, विनोद तावडे

अर्धातास चाललेल्या नृत्य कार्यक्रमानंतर श्याम बेनेगलना पुरस्कार प्रदान सोहळा झाला.राज्यपालाच्या हस्ते बेनेगलना महोत्सवाचे स्मृतिचिन्ह देण्यात आले तर १० लाख रुपयांचा चेक किरण व्ही, शांताराम यांच्या हस्ते देण्यात आला. फिल्म डिव्हीजनने बेनेगल यांच्यावर केलेली १० मिनिटांची चित्रफीत दाखविण्यांत आली. त्यानंतर बेनेगलांनी सत्काराला उत्तर दिले. आपल्या भाषणांत ते म्हणाले, "देशात सध्या सरकारी व बिनसरकारी असंख्य लघुपट व माहितीपट बनत आहेत. पण प्रेक्षकांपर्यत ते पोचण्याची कांहीच व्यवस्था नाही. माझी सूचना आहे की चित्रगृहात चित्रपट खेळाच्या आधी किमान २० मिनिटे डाक्युमेंटरी दाखवल्या जाव्यात. पुरस्कार मिळाल्याबद्दल बेनेगलनी कृतज्ञता व्यक्त केली."

बेनेगलांच्या भाषणाचा धागा पकडून आपल्या टंकलिखित भाषणात राज्यपालांनीही लघुपट/माहितीपट प्रेक्षकांपर्यत पोचण्यासाठी दूरदर्शनने स्वतंत्र चॅनेल सुरु करावे अशी सूचना केली.

**उत्तमोत्तम माहितीपट**

१५व्या महोत्सवात आंतरराष्ट्रीय स्पर्धा भारतीय डॉक्युमेंटरी स्पर्धा स्टुडन्टस फिल्मस इ. विविध प्रकारच्या फिल्मस होत्या.फ्रान्स, रशिया येथील डाक्युमेंटरी दिग्दर्शकांची रिट्रोस्पेक्टीव्ह होती. चल्लमबेनूर, अल्ताफ मजिद, एनव्हीके मूर्ती आणि व्ही. के. शर्मा यांना श्रद्धांजली विभागात त्यांच्या डाक्युमेंटरी दाखवण्यात आल्या.